..Akkalakota Swami Maharaja Stotra ..

# ॥ श्री अक्कलकोट स्वामी महाराज स्तोत्र ॥

मूल्य चिंतन

॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥

ॐ

श्रोता वक्ता श्री पांडुरंग समर्थ ॥

पुंडलीकवरदा हारि विठ्ठल ॥

पार्वतीपते हर हर महादेव ॥

सीताकांतस्मरण जय जय राम ॥

श्री गणेशाय नमः ।श्री अक्कलकोट स्वामी राजाय नमः ॥

सर्व गुणांचा नायक ।बुद्धीज्ञानाचा दायक ।

अखिल विघ्नांचा हारक ।गजानना मी नमितसे ॥१॥

नमन माझें मयुरेश्वरी ।विद्यादेवी वागेश्वरी ।

ग्रंथ लिहावया मजवरी ।कृपा करी जगदंबे ॥२॥

श्री गुरुदत्ता वंदीतसे ।त्रिगुणाचा अवतार असे ।

कलियुगी जो नांदतसे ।प्रगटरूप होऊनी ॥३॥

स्वामी दत्ताचा अवतार ।सर्व भाविका आधार ।

करितो वंदन साभार ।कृपा प्रसाद मिळावया ॥४॥

भिन्न विषयांचे भिन्न गुरू ।त्यांच्या ठिकाणीं धरुनी आदरू ।

वंदुनी तया मागतो वरू ।कार्यसिद्धी व्हावया ॥५॥

मी तो आहे मतिहीन ।परि इच्छा गावया तव गुण ।

तुझ्या नांवें स्तोत्र करून ।सेवा करावी आपुली ॥६॥

नाहीं वाचन नाहीं लिखाण ।नाहीं ज्ञान नाहीं ध्यान ।

कोणतें करू आकर्षण ।तव प्रीति मिळावया ॥७॥

कामादि षड्रिपू छळिती ।मायेनें गात्रें गळती ।

मनींचें मांडे मनीं राहती ।निराशा ती चहूंकडे ॥८॥

मन चंचल वाऱ्यापरी ।स्थिर होत नाहीं ध्यानावरी ।

तव कृपा नच हो जरी ।व्यर्थ आयुष्य जाईल हें ॥९॥

संसारि सुख व्हावें म्हणुनी ।अहोरात्र कष्टा करूनी ।

दुःख होतें शतगुणी ।धन दौलत येतां परी ॥१०॥

नकळत आयुष्य चाललें ।इंद्रियावरी ताबा न चले ।

किती एक निश्चयो ढळले ।काय करावे न कळे ॥११॥

संसार यातना कठीण । कनक कांता मोह दारुण ।

किती पापें घडती हातून ।स्मरतां भिती वाटतसे ॥१२॥

माझें माझें करितों निशिदिनी ।परी विचारित नाहीं कोणी ।

सुखाचे असती सर्वधनी ।व्यवहार हा जगींचा ॥१३॥

ज्ञानाच्या गोष्टी सांगती ।आचारीं ज्या कधी न येती ।

मृगजळापरी सर्व भासती ।तृप्ती कधीं न होतसे ॥१४॥

स्वानुभवावाचून बोलती ।उपदेशामृता पाजिती ।

परी भाव तो नाहीं चित्तीं ।बोल तें फोल होतसे ॥१५॥

गर्वोक्तीनें बोलतसे ।सर्वांना तुच्छ मानीतसे ।

शहाणा काय तो मीच असे ।मनीं ऐसे समजतो ॥१६॥

पुस्तकीं ज्ञान वाचिलें ।ज्ञानवंती सांगितलें ।

परी हृदयीं ठसावलें ।काय करू महाराजा ॥१७॥

नियम केले बहुतापरी ।न होतां यथासांग जरी ।

फलश्रुति नच ये करी ।व्यर्थ कष्ट होत असे ॥१८॥

किती काळ नेत्रा मिटतो ।तव मूर्ती ध्यानीं आणितो ।

परी न खोले अंतःचक्षू तो ।उपाय कोणता करू मी ॥१९॥

नामस्मरण करितां जरी ।कार्य होते भराभरी ।

ऐशी भाषा ऐकतो परी ।अनुभव कां तो येईन ॥२०॥

वाचतो ऐकतो बहू ते ।परी ध्यानी मुळी न राहते ।

पाठ्य ते विसरुनी जाते ।काय करावे समजेना ॥२१॥

पूर्वार्जित असती भोगाभोग ।ते भोगण्यासि हा जन्मयोग ।

तरावयाचा कधीं ये सुयोग ।कोणी कांहीं सांगेना ॥२२॥

पापपुण्याचा हिशोब न कळे ।भ्रांत होते मन त्यामुळे ।

कार्याकार्यी नित्य गोंधळें ।प्राणिमात्र या जगीं ॥२३॥

आयुष्य आले संपावया ।हा जन्म जाईल कीं वाया ।

याची चिंता नित्य हृदया ।स्वामी माते वाटतसे ॥२४॥

आतां करितो एक विनंती ।गुणावगुणा नाणी चित्तीं ।

सदय हृदय धरुनी हातीं ।हेतु सफल करावा ॥२५॥

अनन्यभावें शरण तुजशी ।जागृती स्वप्नीं त्या वाचविशी ।

त्यांची चिंता नित्य वहासी ।हे तो सर्वां ठाऊक ॥२६॥

तूं ही माता तूं ही पिता ।पाळिता सर्वां सांभाळितां ।

सर्व संकटीह रक्षणकर्ता ।स्वामी अमुचा आहेस तूं ॥२७॥

केलें तें विसरूनि जाई ।क्षमा करी मज लवलाही ।

शरण आलो तुज पाही ।भेट द्यावी स्वामि मला ॥२८॥

तुझ्या नांवाची केली नौका ।मध्यें बसुनी मारितो हाका ।

डळमळे तारू वाटे धोका ।घे मज स्वामी परतीरा ॥२९॥

मी तो आहे पूर्ण अज्ञानी ।परी शरण तुज लागोनी ।

पाही मज कृपा दृष्टीनी ।धन्य होईल स्वामिया ॥३०॥

स्वामी केव्हां कोठे उद्भवले । हे तो कोणा नाहीं कळले ।
दत्तावतार मानियले । सर्व थोर विभुतींनी ॥ ३१॥
प्रथम दत्त श्रीपाद दुसरे । नृसिंह सरस्वती हे तिसरे ।
चवथे स्वामी साजरे । चार अवतार पुरुष हे ॥ ३२॥
तेजःपुंज कांति दिव्य । गौरवर्ण शरीर भव्य ।
आजानबाहू महाभाग्य । देहसौष्ठव न वर्णवे ॥ ३३॥
नासिका सरल कर्ण विशाल । छाती भरघोस गती चपल ।
कौपीन कधीं नग्न नवल । सर्व भाविका वाटतसे ॥ ३४॥
शिरोत्तम सुंदर भिवया । नेत्रकमल भरले कृपया ।
स्फटिक माला शोभे हृदया । कमरशोभा मेखला करी ॥
३५॥
कमलैव चरण भासती । कांती पाहुनि नेत्र दिपती ।
वदन शोभा चंद्रापरि ती । रेखीव सर्व स्वरूप तें ॥
३६॥
स्वामीच्या त्या लीला बहुत । वर्णितो तेथें किंचित ।
तेणें वाढे भक्ति मनांत । हेतु साध्य व्हावया ॥ ३७॥
स्वामीने दृष्टी फिरविता । वांछित आपुले ये हाता ।
स्वामीतें शरण जाता । दुरित जाती पळोनी ॥ ३८॥
राव रंका मानी समान । वागवी सर्वां प्रेमें करून ।
करी भक्त शंका निरसन । न बोलतां क्रिया करोनी ॥ ३९॥
चोळाप्पा भक्ति शिरोमणी । आणिला स्वामी चिंतामणी ।
अर्पितां सर्वस्व तच्चरणी । स्वामी प्रकटरूप जाहले ॥ ४०॥
रहिले स्वामी चोळाप्पा घरीं । लीला केल्या बहुतांपरी ।
घेऊनि परीक्षा परोपरी । सत्पात्र केले तयाते ॥ ४१॥
मोडी फोडी फेकुन देई । कृष्णवत केली नवलाई ।
चोळप्पा पत्नी होऊन आई । सांभाळिले ब्रह्मरूप ते ॥ ४२॥
चोळाप्पाची एकनिष्ठ भक्ति । दिल्या पादुका दिव्य शक्ति ।
झाली त्यांची सर्वत्र कीर्ति । दर्शनीं मुक्तजन झालें
॥ ४३॥
बाळाप्पा स्वामीभक्त श्रेष्ठ । मानिली स्वामीसेवा इष्ट ।
सांगतो त्यांची अल्पशी गोष्ट । स्वामी लीला वर्णावया
॥ ४४॥
संसार सोडिला बाळाप्पाने । स्वानंद मिळाया स्वामी
कृपेनें ।
केली पदयात्रा त्याने । अक्कलकोटी पातला ॥ ४५॥
अनन्य भावे सेवा केली । तहान भूक हरपली ।
सर्वस्व देतां विरक्त झाली । बाळाप्पाची वृत्ति पहा ॥
४६॥
मारुनी चापटी पाठीवर । केले बाळाप्पा मन स्थिर ।
करावया भक्ति दृढतर । हंसध्वज चरित्र दाविले ॥ ४७॥
निर्लज्ज होऊनी सेवा करावी । हिशेब ठेवोनी जपमाळ
घ्यावी ।
गुरु येत जवळी शंका नसावी । स्वामी बोलले बाळाप्पा ॥
४८॥
बाळाप्पाची पाहुनी भक्ति । कृतकृत्य केले त्यास जगतीं ।
वाढली बाळाप्पाची कीर्ति । अक्कलकोटी मठ स्थापितां ॥
४९॥
स्वामी सूत मुंबापुरीचे । महान भक्त श्री स्वामीचे ।
अलौकिक प्रेम हो त्यांचे । वर्णन कसें करूं मी ॥ ५०॥
हरीभाऊ त्यांचें मूळ नांव । जिल्हा रत्नागिरी इलिया
गांव ।
गांवचे खोत दृढ स्वभाव । लहानपणा पासोनी ॥ ५१॥
नोकरीवरी संकट आले । स्वामी कृपें दूर झालें ।
तत्काळ अक्कलकोटी गेले । श्री स्वामीते भेटावया ॥ ५२॥
हात ठेवितां मस्तकावर । षड्रिपू ते गेले दूर ।
वैराग्य आले अनिवार । स्वामी कृपाप्रसादें ॥ ५३॥
दिल्या पादुका स्वामीसुतास । स्थापावया मुंबापुरीस ।
सोडोनि आपुल्या नोकरीस । लोककल्याणार्थ झटावे ॥ ५४॥
लुटवली घरदार संपत्ती । बोलावुनी ब्राह्मणाप्रती ।
धन्य धन्य ती तारका सती । शुभ्र वस्त्र तें नेसली ॥ ५५॥
घेतली हातात तुंबरी । घेवोनि स्वामी अंतरी ।
भजन करी निरंतरी । स्वामी अगाध लिलांचे ॥ ५६॥
दादा बुवा मोर पाखरूं । मस्तकी ठेवोनिया करू ।
विरक्त केलें देवोनि वरू । अघटित घटना करवली ॥ ५७॥
आनंदनाथ वालावलचे । मस्तकीं तुकडे डहाळीचे ।
पडता दर्शन स्वामीचे । अक्कलकोटी जाहले ॥ ५८॥
दिगंबर होवुनी राहिले । सहा वर्षें तप केले ।
अनुज्ञा होता निघाले । स्वामी मठ स्थापावया ॥ ५९॥
झाले स्वामी तया प्रसन्न । आत्मपादुका स्वयंपूर्ण ।
काढोनि दिल्या मुखांतून । आनंदनाथ धन्य झाला ॥ ६०॥
तात महाराज तीन वर्षाचें । झाले भक्त
बाबुलनाथाचे ।
तीनवेळा दृष्टांत स्वामीचे । होतां गेले अक्कलकोटीं ॥
६१॥
वडाखाली जातां पाहिले । श्रीशंकरानें स्वामीस
वंदिलें ।
तत्काळ स्वामीचरणां नमिलें । स्वामी सेवक जाहले ॥ ६२॥
बाळकृष्ण दादर मठाचे । पूर्ण नास्तीक मूळचे ।
उपदेश ऐकुनि ताताचे । स्वामीचे भक्त जाहले ॥ ६३॥
नित्यानंद भजनांत । वैराग्यें झाले सिद्धभक्त ।
स्वामी चरणीं अनुरक्त । नित्य राहिले बाळकृष्ण ॥ ६४॥
विष्णुबुवांचा गर्व हरला । स्वप्नीं विंचवाचा मारा
केला ।
शरण येतां मुक्त झाला । खरा मर्ग दाखविला ॥ ६५॥
ठाकुरदास मुंबईचे । देऊनी भस्म लाकडाचे ।
कुष्ट गेलें तत्क्षणी त्यांचे । स्वामीभक्त तो जाहला ॥

६६ ॥
दादासाहेब चिंचोरकर । कुष्ट झालें मांडीवर ।
बघतां घाबरले फार । गेले शरण स्वामिया ॥ ६७ ॥
आंगठी पांढऱ्या खड्याची । घडवलेली सोन्याची ।
जरी होती बहु मोलाची । फेकून देण्या सांगितलें ॥ ६८ ॥
कुष्ट ते गेलें तात्कालिक पाहूनि स्वामींचें कौतुक ।
जडली भक्ति अत्यंतिक । संसारीं सुखी जाहले ॥ ६९ ॥
दामले वकील भक्तश्रेष्ठ । मुळव्याध झाली अनिष्ट ।
गोमुत्रानें केली नष्ट । अक्कलकोटकी स्वामीनें ॥ ७० ॥
अनुज्ञा मागे बंडास । शरण जाऊनी स्वामीस ।
नकार दिला जाणूनी दुःखास । वासुदेव बळवंताते ॥ ७१ ॥
चिंतोपंत आप्पाटोळ । स्वामीतें भजनी सर्वकाळ ।
पूजार्थ देती स्वामी दयाळ । पाटावरी पादुका उमटवूनी
॥ ७२ ॥
राधानांवें कसबीण । रूपवती कलावंतीण ।
स्वामी दर्शना लागोन । आली भाग्य तें उदेलें ॥ ७३ ॥
स्वामीची कांती देखतां । पडे मोह तिच्या चित्ता ।
मिळावा नर भोक्ता । मनीं इच्छा जाहली ॥ ७४ ॥
जों जों स्वामीकडे पाही । कामातूर राधा होई ।
कटाक्षें इच्छा प्रगटवी । स्वामी कौतुक पाहती ॥ ७५ ॥
तिचा तो काम जावयाते । देई स्तना ब्राह्मणाते ।
बोलले स्वामी तियेतें । राधा आश्चर्य जाहली ॥ ७६ ॥
स्तन जातां विरक्त झाली । अनन्य भावें शरण गेली ।
काशीतें जाऊनी राहिली । स्वामीची सेवा करीत ॥ ७७ ॥
श्रीरामानंद बिडकर । हनुमानाचा भक्त थोर ।
विरक्त व्हावया लौकर । श्री स्वामीतें शरण गेले ॥ ७८ ॥
स्वामीचा लागतां छंद । बिडकरा जाहला आनंद ।
केलें भजन होऊनी धुंद । संवत्सर एक तयानें ॥ ७९ ॥
करण्या पाद संवाहनातें । बिडकर बैसले रात्रीतें ।
जानुमध्ये द्वय नागाते । फणा काढतां देखिलें ॥ ८० ॥
निर्भयपणें सेवा केली । स्वामी उठले निद्रा झाली ।
क्रोधानें थप्पड दिली । जिंदा राक्षस बोलले ॥ ८१ ॥
बिडकर बेशुद्ध पडले । शुद्धीवर येतां ज्ञान झाले ।
प्रखर वैराग्य प्राप्त झाले । तेव्हापासूनि बिडकरा ॥ ८२ ॥
बोटे स्वामी चवदा वर्षांचे प्रीतीपात्र चिदंबराचें ।
दर्शन घेण्या श्रीस्वामीचें । पायीं चालत निघाले ॥
८३ ॥
स्वामीसाठीं पेढा घेतला । परी दर्शनीं तल्लीन
झाला ।
पेढा विसरातां घेतला । स्वामीने त्याच्या पासोनी ॥ ८४ ॥
नृसिंह सरस्वती आळंदीचे । प्रयोग करिती हटयोगाचे ।
मार्ग न मिळता समाधीचें । गेलें शरण स्वामीया ॥ ८५ ॥
श्लोक अज्ञा चक्र भेदाचा । सांगता योग शास्त्राचा ।
साधला योग समाधीचा । नृसिंह सरस्वतीतें ॥ ८६ ॥
समाधीनें सिद्धी मिळाली । शिष्य परंपरा वाढली ।
किर्ती सर्वत्र पसरली । साधु साधु म्हणोनी ॥ ८७ ॥
रावजी पाटील विठाबाई । स्वामी प्रसन्न पूर्व पुण्याई ।
अजब केली कारवाई । रामपूर ग्रामामध्यें ॥ ८८ ॥
चाळीस माणसांचा नवस । फेडावया धरूनी उद्देश ।
स्वामी यावे जेवावयास । हात जोडोनी विनविले ॥ ८९ ॥
घातले मंगल स्नानाते । मनोभावे पूजिता श्रीते ।
बोलले स्वामी दंपत्याते । भोजन सर्वा घालावे ॥ ९० ॥
दंपत्य साशंकमनीं झालें । स्वामीनें तत्क्षणी जाणले ।
सर्वान्न आणाया सुचविलें । रावजी विठाबाईस ॥ ९१ ॥
देवी खंडोबादि टाक आणिले । अन्नामाजी ते ठेविले ।
अन्नपूर्णा पूजन करविले । पंक्ती बसविल्या जेवावया ॥ ९२ ॥
चार हजार वृंद जेविला । स्वामीचा जयजयकार झाला ।
अद्‌भुत चमत्कार पाहिला । आबाल वृद्ध जनांनी ॥ ९३ ॥
पाण्याच्या गुळण्या टाकिल्या अग्निज्वाळा प्रदीप्त झाल्या ।
जैशा कां घृत आहुती दिल्या । होम कुंडा माझारी ॥ ९४ ॥
आला न्यावया काळपुरुष । बाबा जाधव भक्तास ।
धरी घट्ट स्वामी चरणास । सेवा पुरी करावया ॥ ९५ ॥
यमाते परत पाठविले । वृषभाते नेण्या सांगितले ।
जाधवाते वाचविले । वृषभ केला मुक्त तो ॥ ९६ ॥
इटगीचा रावण्णा वाणी । सर्प दंशे पडला धरणीं ।
मारिल्या हाका त्रिवार कर्णी । उठला स्वामी प्रतापे ॥ ९७ ॥
श्री गुरुकाका महाराजांनें । नोकरी सोडली स्वामी
आज्ञेनें ।
मठ स्थापिला प्रेमानें । गोवित्री गांवीं जाऊन ॥ ९८ ॥
गोवित्री गायत्रीचें स्थान । करावया अनुष्ठान ।
गायत्री मंत्राचे ज्ञान । लाधलें स्वामी कृपेनें ॥ ९९ ॥
लीला तो अगणीत असती । परी किंचित दाविल्या स्तोत्रीं ।
त्या योगें ठसावें चित्तीं । स्वामी तो पूर्णावतार ॥ १०० ॥
अनंत कोटी ब्रह्मांड नायक । न वर्णावे वर्णितां लौकीक ।
शरण आलो मारितो हाक । मार्ग तो मज दाखवी ॥ १०१ ॥
ध्यानांत आणोनी स्वामीतें । पूजन करा एकाग्र चित्तें ।
लावोनी धूपदीप नैवेद्याते । आदरें स्वामीस अर्पावे ॥ १०२ ॥
सुप्रभातीं शयन काळीं । स्तोत्र म्हणावे एकांत स्थळीं ।
येईल प्रेमाची उकळी । आनंदभाव दाटतील ॥ १०३ ॥
भावे वंदुनी प्रार्थना करा । जयजय समर्था स्वामी
वरा ।
कैवारी दिनांचा आसरा । स्वामी राया तूं असे ॥ १०४ ॥
कर्तुमकर्तुं तुझी शक्ति । दुर्गुणाचेए सद्‌गुण मूर्ति ।
घडविशी तूं सहजगती । हें तो मी जाणतसे ॥ १०५ ॥
कोणा कैसे उद्धरावे । ही तो रीति तुज ठावें ।
मज विषयीं मी काय सांगावें । जाणतोसी तूं सर्व ॥

१०६॥
या जगीचें महागूढत्व ।उकलूनी दावी मज तत्त्व ।
किती तळमळती तव ।भक्त कृपा करी महाराजा ॥१०७॥
तूं अससी अक्कलकोटकीं ।अज्ञानाच्या सारूनि पुटी ।
भवसागर परतटाकी ।नेण्या समर्थ तूं एक ॥१०८॥
तूंचि मालक तूंचि चालक ।भक्तांचा संकट
निवारक ।
दुर्जनांचा संहारक ।शरण आलो मी तुला ॥१०९॥
स्वामी समर्था तूंचि एक ।दृढावला हाचि विवेक ।
तूंचि होई मार्गदर्शक ।परमार्थ साधावयासी ॥११०॥
प्रतिदिनीं पाठ म्हणावया ।स्फूर्ति दिली स्तोत्र करावया ।
समर्पण हें तव पाया ।गोड करूनी तें घ्यावें ॥१११॥
जे जे म्हणतील या स्तोत्रातें ।प्रेमें पाळुनी सयंमाते ।
त्यांची इच्छा पुरविण्यातें ।स्वामी समर्थ आहेत ॥११२॥
संसारियासी सुख व्हावया ।सर्व चिंता नष्ट व्हाया ।
आरोग्य संतती मिळावया ।स्तोत्राधार तो होवो ॥११३॥
विद्यार्थियाला विद्या मिळावी ।धनार्थीकडे संपत्ति यावी ।
मन कामना पूर्ण व्हावी ।स्तोत्र म्हणतां स्वामीराया ॥
११४॥
नियमाने जे पाठ करिती ।त्यांची चिंता स्वामी वहाती ।
दृढभाव असावा चित्तीं ।मनीं संशय नसावा ॥११५॥
स्तोत्र म्हणतां एकाग्र मनीं ।व्हावे नम्र स्वामी चरणीं ।
मूर्ति दिसेल नयनी ।जागृती स्वप्नीं प्रत्यक्ष ॥११६॥
स्तोत्रे व्हावें सर्वांचें कल्याण ।न पडावी कशाची
वाण ।
स्वार्थ परार्थ मिळवून ।स्वामी समर्थ देतील ॥११७॥
स्वामीनें स्फूर्ति दिधली ।भास्करें कृतिही केली ।
स्वामी चरणी ठेविली ।अगाध शक्ति स्वामिची ॥११८॥

इति श्री अक्कलकोट स्वामी स्तोत्रं संपूर्ण ॥
शुभं भवतु ॥

श्री स्वामी समर्थाष्टक

असे पातकी दीन मी स्वामि राया ।
पदीं पातलों सिद्ध व्हा उद्धराया ॥
नसे अन्य त्राता जगीं या दिनाला ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थूं कुणाला ॥१॥
मला माय ना बाप ना आप्त बंधू ।
सखा सोयरा सर्व तूं दीन बंधू ॥
तुझा मात्र आधार या लेकराला ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थूं कुणाला ॥२॥
नसे शास्त्र विद्या कलादीक कांहीं ।
नसे ज्ञान वैराग्य तें सर्वथा ही ॥
तुझें लेकरूं हि अहंता मनाला ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थूं कुणाला ॥३॥
प्रपंची पुरा बद्ध झालों दयाळा ।
तुझा दास मी स्मृताना मनाला ॥
क्षमेची असे याचना त्वत्पदाला ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थूं कुणाला ॥४॥
मला काम क्रोधादिकीं जागवीलें ।
म्हणोंनी समर्था तुला जागवीलें ॥
नको दूर लोटूं तुझ्या सेवकाला ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थूं कुणाला ॥५॥
नको अंत पाहूं त्वरें धांव घेई ।
तुझ्यावीण नाहीं दुजी श्रेष्ठ आई ॥
अनाथासि आधार तुझा दयाळा ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थूं कुणाला ॥६॥
कधीं गोड वाणी न येई मुखाला ।
कधीं द्रव्य ना अर्पिले याचकाला ॥
कधीं मूर्ति तूझी न ये लोचनाला ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थूं कुणाला ॥७॥
मला एवेढी घाल भिक्षा समर्था ।
मुखें नित्य गावी तुझी गुण गाथा ॥
घडो पादसेवा तुझा किंकराला ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थूं कुणाला ॥८॥
॥श्री स्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

मनाची प्रार्थना

जोडोनिया कर चरणी ठेविला माथा ॥
परिसावी विनंती माझी सद्गुरुनाथा ॥
असो नसो भाव आलो तुझीया ठाया ॥
कृपा दृष्टी पाहे मजकडे सद्गुरुराया ॥
ज्या ज्या स्थळीं हें मन जाय माझें ॥
त्या त्या स्थळीं हें निजरूप तुझें ॥
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी ॥
येथें तुझे सद्गुरु पाय दोन्ही ॥
॥श्री गुरुदेव दत्त ॥

॥श्री ॥
श्री गणेशाय नमः ।श्री सरस्वत्यै नमः ॥
श्री गुरुभ्यो नमः ।श्री कुलदेवताभ्यो नमः ॥
श्री इष्टदेवताभ्यो नमः ।श्री ग्रामदेवताभ्यो नमः ॥
श्री स्थानदेवताभ्यो नमः ।श्री सर्वदेवताभ्यो नमः ॥
श्री नवग्रहदेवताभ्यो नमः ।श्री मातापितृभ्यां नमः ॥

॥ शुभं भवतु ॥

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated October 4, 1999